**अपंग व्यक्तीसाठी वापरावयाच्या दुचाकी व चारचाकी वाहनांमध्ये फेरफार करण्याबाबत**

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

**क्रमांक - एमव्हीआर ०९०२/सीआर-४६-सी एफ/का.२(४)/जा.क्र** 2983 **दिनांक** 15 FEB 2012

**संदर्भ** :-१. केंद्र शासनाचे पत्र क्र.आरटी-११०१२/१२/०१-एमव्हीएल, दि.२३/०७/२००८.
२. केंद्र शासनाचे पत्र क्र. आरटी ११०१७/०७/२०११-एमव्हीएल, दि. ५/५/२०११
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमव्हीआर ०९०२/सीआर-४६-डी/का.२(४)/जा.क्र.७८१७, दि.२९/६/२०११
४. या कार्यालयाचे पत्र क्र. एमव्हीआर ०९०२/सीआर-४६-सीएफ/का.२(४)/जा.क्र.१०२९१, दि.१७/८/२०११.
५. शासन पत्र क्र.एमव्हीआर-०११२/प्र.क्र.१२१/परि-२, दि.३०/१/२०१२.

**प रि प त्र क**

अपंग व्यक्तीच्या वापरावयाच्या वाहनातील फेरफारास मान्यता देण्यासाठी होत असलेल्या विलंबाबद्दल बरीच निवेदने या कार्यालयास प्राप्त होत आहेत. अशा व्यक्तींसाठी वापरावयाच्या वाहनातील फेरफारास मान्यता देण्याचे अधिकार नोंदणी प्राधिकाऱ्यांना प्राप्त नसल्याने सध्या सदर वाहनाची नोंदणी करण्यासाठी बराच कालावधी लागतो. अपंग व्यक्तींना होणारा त्रास व त्यांची गैरसोय टाळणे व त्यांच्या वाहनांची नोंदणी करणे सुलभ व्हावे ही बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने संदर्भीय पत्र क्र.१ व २ द्वारे दिलेल्या निर्देशानुसार, यापूर्वी यासंबंधाने जारी या कार्यालयाने जारी केलेली सर्व परिपत्रके अधिक्रमीत करून सदर परिपत्रक जारी करण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाने अपंग व्यक्तीने वापरावयाच्या दुचाकी वाहनांमध्ये केलेल्या फेरफारास मान्यता देण्यासाठी संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये नमूद अधिसूचनेव्दारे खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत केली आहे.

अ) रेट्रोफिटरने बनविलेल्या रेट्रोफिटमेंट किटला, केंद्र शासनाने केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम १२६ नुसार मान्यता दिलेल्या तपासणी संस्थांकडून प्रमाणित करून घेणे, बंधनकारक करण्यात आले आहे.

ब) सदर तपासणी संस्थांनी कोणत्या चाचण्या कशाप्रकारे घ्याव्यात हे अधिसूचनेतील परिच्छेद क्र.४.१ व क्र.४.२ मध्ये विहीत करण्यात आले आहे.

क) दुचाकी वाहनांमध्ये अपंग व्यक्तीसाठी कोणते फेरफार करता येतील हे अधिसूचनेतील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केले आहे.

ड) एखाद्या व्यक्तीमध्ये कोणत्या प्रकारचे शारीरीक अपंगत्व आहे याचा विचार करून, वाहनात फेरफार करण्यास व वाहन चालविण्याचे लायसन्स जारी करण्यास मान्यता देता येईल. हे अधिसूचनेच्या परिच्छेद क्र.६ मध्ये नमूद केले आहे.

इ) वाहन हे अपंग व्यक्तीने वापरावयासाठी आहे हे दर्शविणारे चित्र (स्टिकर) व वाहनाच्या पुढे, मागे लावावयाच्या रेट्रोरिफ्लेक्टीव्ह टेपबाबत तरतूदी, अधिसूचनेच्या परिच्छेद क्र.४.३.व क्र.४.४ मध्ये आहेत.

३. अपंग व्यक्तींना वाहन चालविण्यासाठी त्यात कोणते फेरफार करणे आवश्यक आहे याबाबतचा दाखला प्राप्त करण्यासाठी अपंग व्यक्तींना अखिल भारतीय भौतिक चिकीत्सा आणि पुनर्वसन संस्था, हाजी अली, मुंबई-३४ येथे जावे लागते. हा त्रास टाळण्यासाठी सदर अधिसूचनेत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अधिकृत वैद्यकीय मंडळ (a duly constituted board) स्थापन करण्याबाबत तरतूद अधिसूचनेच्या परिच्छेद क्र.६ मध्ये विहीत केली आहे. सदर मंडळाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) हे अध्यक्ष असतील आणि औषधविषयक (मेडीसीन) वैद्यकीय अधिकारी व एक अस्थी तज्ञ (ऑर्थोपेडीक्स) डॉक्टर हे सदस्य असतील.

सबब, केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेची प्रत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे निदर्शनास आणून अशा प्रकारचे मंडळ स्थापन करण्याची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास ३० दिवसाच्या आत सादर करावा.

४. केंद्र शासनाने संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, अपंग व्यक्तींसाठी दुचाकी वाहनातील फेरफार जर राज्य शासनाने मान्यता दिलेल्या अधिकृत कार्यशाळेमध्ये करण्यात आले असतील तर संबंधीत प्राधिकाऱ्यांनी (concerned authority) त्या वाहनाच्या नोंदणीस मान्यता द्यावी असे नमूद केले आहे.

५. राज्य शासनाने मे.फेरो इक्वीप, मुंबई यांना दि.१/१०/२०११ रोजीच्या आदेशाव्दारे अपंग चालकांच्या चारचाकी वाहनामध्ये बदल करण्यासाठी अधिकृत कार्यशाळा म्हणून मान्यता दिली आहे. या कार्यालयाच्या संदर्भीय परिपत्रक क्र.३ नुसार, या संस्थेच्या वाहनांची कार्यालय प्रमुखांनी स्वतः वाहन तपासणी करून त्यांच्या नोंदणीबाबत निर्णय आपल्या स्तरावर घेण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

६. एआरएआय, पुणे या संस्थेने मान्यता दिलेल्या व संबंधीत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी कार्यशाळांची तपासणी करून त्यांना अधिकृत कार्यशाळा म्हणून मान्यता देण्यासाठी, खालील संस्थांचे प्रस्ताव या कार्यालयाने शासनाला सादर केले आहेत. शासनाकडून मान्यता प्रलंबित आहे.

| संस्थेचे नाव | वाहनाचा संवर्ग | एआरएआय, पुणे प्रमाणपत्र दिनांक | शासनास प्रस्ताव सादर केलेला दिनांक |
|---|---|---|---|
| मे. ॲटोमेट इंडीया, पुणे | चारचाकी | दि.१६/१२/२०१०, | दि.१९/१०/२०११ |
| मे.कोटकर एनर्जी डायनॅमिक, पुणे | चारचाकी | दि.१६/९/२०१० | दि.३/१२/२०११ |
| मे.फॅबियन प्लॅस्टिक, पुणे | दुचाकी | दि.११/३/२००९ | दि.२३/१२/२०११ |

क्र.६ मध्ये नमूद केले आहे.

७. एआरएआय, पुणे या संस्थेने मान्यता दिलेल्या खालील संस्थांच्या अधिकृत कार्यशाळा मान्यतेचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यांची छाननी / तपासणी सुरू आहे.

| संस्थेचे नाव | वाहनाचा संवर्ग | एआरएआय, पुणे प्रमाणपत्र दि. | या कार्यालयाच्या पत्राचा दि. |
|---|---|---|---|
| मे. कोझी इंडिया मुंबई | दुचाकी | दि.२४/११/२०११, | दि.०३/१२/२०११ |
| श्री. बबन सतप्पा सुतार, कोल्हापूर | दुचाकी | दि.०७/०६/२०११ | दि.११/०७/२०११ |

८. केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्र क्र.२ मधील परिच्छेद क्र.२ मध्ये, देशातील सर्वच राज्यांमध्ये अद्याप अधिकृत कार्यशाळांची स्थापना करण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच परिच्छेद क्र.३ मध्ये ज्या राज्यात मान्यता प्राप्त कार्यशाळा नसतील तेथे शासनाने नोंदणी करण्यापूर्वी वाहनाची तपासणी करावी (States have to inspect the vehicle) असे नमूद केले आहे. तसेच सदर पत्रातील परिच्छेद क्र.५ मध्ये वाहनातील फेरफार तपासणीबाबत राज्यातील 'concerned authority may inspect the vehicle' असे नमूद केले आहे.

सबब, केंद्र शासनाच्या संदर्भांकित पत्रातील परिच्छेद क्रमांक ३ मधील 'States' या शब्दाचा अर्थ राज्यातील संबंधीत नोंदणी प्राधिकारी (concerned registering authority) असा अभिप्रेत असावा अशी या कार्यालयाची धारणा असून ती पक्की करण्यासाठी या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्र.४ नुसार शासनास विनंती केली होती.

९. शासनाने संदर्भीय पत्र क्र ५ नुसार केंद्र शासनाच्या दि.५/५/२०११ रोजीच्या पत्रातील निर्देश हे स्वयंस्पष्ट आहेत असे कळविले आहे.

१०. केंद्र शासनाच्या दि.५/५/२०११ रोजीच्या पत्रातील परिच्छेद क्र. ५ मध्ये, अपंग व्यक्तिसाठी वापरावयाच्या वाहनातील फेरफार तपासणीबाबत राज्यातील 'concerned authority may inspect the vehicle' असे नमूद केलेले आहे. त्यानुसार 'concerned authority' म्हणजे संबंधित नोंदणी प्राधिकारी असा अर्थ अभिप्रेत आहे.

११. उपरोक्त वस्तुस्थितीचा व केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त सूचनांचा विचार करता, सर्व नोंदणी प्राधिकाऱ्यांना अपंग व्यक्तीसाठी वापरावयाच्या दुचाकी व चारचाकी वाहनांमध्ये फेरफार करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

i) एआरएआय, पुणे या संस्थेने वरील परिच्छेद क्र. ६ आणि ७ मध्ये नमूद केलेल्या संस्थांना ज्या वाहनांच्या प्रतिमानांसाठी (Make and Model of Vehicle) मान्यता दिलेली आहे अशा वाहनांमध्ये फेरफार केल्यास त्या वाहनाची तपासणी करावी.

ii) सदर वाहनातील केलेले फेरफार यांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याची व अर्जदार अपंग व्यक्ती ते वाहन समाधानकारकरित्या चालवू शकत असल्याची **स्वतः कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.**

iii) त्यानंतर सदर प्रकरणात त्यांच्या स्तरावर विनाविलंब मान्यता देण्याची कार्यवाही करून सदर वाहनाची नोंदणी करावी व वाहनात केलेल्या फेरफाराची नोंद नोंदणी प्रमाणपत्रात घेण्यात यावी.

iv) शासन अधिसूचना क्र.MTA 1780/25/(75)-TRA 3 दि.०१/०४/१९८० मधील खंड (a)(xii) नुसार, सदर वाहनास मोटार वाहन करातून सूट देण्यात यावी.

v) वाहनात केलेले फेरफार हे कायमस्वरूपी यांत्रिकदृष्टया सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी, संबंधित वाहन मालकाची असेल व सदर वाहनाच्या विक्रीनंतर दिलेली परवानगी वैध असणार नाही. तसेच त्या वाहनास करमाफी अनुज्ञेय असणार नाही याबाबत संबंधीत वाहन मालकास लेखी कळविण्यात यावे.

vi) केवळ परिवहनेतर संवर्गातील वाहनांमध्येच फेरफार करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

अपंग व्यक्तीसाठी वापरावयाच्या वाहनामध्ये फेरफार करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यास प्राधान्य देऊन त्यावर त्वरीत कारवाई करावी जेणेकरून अपंग व्यक्तींना त्रास अथवा त्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(वि.ना.मोरे) १५/५/१२
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई.**

**प्रति,**
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

**प्रत सादर-** प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
**प्रत-** सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.